https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -१४४ बुधवार,दि.२९ जानेवारी २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed Daily Marathi | Year-5th | Issue-144 | Wednesday, Dt.29 January 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर

## सुप्रीम कोर्टानं दिली नवी तारीख



नवी दिल्ली : जवळपास गेल्या 4 वर्षांपासून लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होते. सर्वाच्च न्यायालयात (Supreme Court) आज 23 व्या नंबरवर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व ओबीसी आरक्षण यांच्यातील याचिकेवर अंतिम सुनावणी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, पुन्हा एका तारीख पे तारीख पाहायला मिळाली आहे. राज्य सरकारच्यावतीने तुषार मेहता यांनी बाजू मांडली. त्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी नवी तारीख दिली असून पुढील सुनावणी 25 फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यामुळे, आणखी जवळपास एक महिन्यानंतर ही सुनावणी होणार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका (Election) पुढे ढकलण्यात आल्याचं दिसून येत आहे. दरम्यान, दुसरीकडे राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली असून शिवसेनेकडून मुंबई महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा देखील केली आहे. मात्र, अजून काही काळ सर्वांनाच वाट पाहावी लागेल.

कोर्टाने कुठेही निवडणुकांना स्थगिती दिली नाही. पण, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडे याबाबत निर्णय घेण्याची विनंती केली होती. त्यातच, आज न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासंदर्भात काही जणांना न्यायालयात धाव घेतली आहे. ओबीसी आरक्षण असो की नसो पण निवडणुका व्हाव्यात अशी मागणी या याचिकाकर्त्यांनी आहे. दरम्यान, राज्यात महायुतीचं सरकार आल्यानंतर, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच व्हाव्यात यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते. राज्य सरकार म्हणून न्यायालयात बाजू मांडताना सर्वोच्च न्यायालयाकडून लवकरात लवकर अंतिम सुनावणी करावी अशी विनंती असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले होते. आता, याप्रकरणी आज झालेल्या सुनावणीत न्यायालयाने 25 फेब्रुवारी ही नवी तारीख दिली असून पुढील सुनावणी तेव्हाच होणार आहे. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणखी काही काळ पुढे ढकलण्यात आल्याचं दिसून येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचे भविष्य असणार आहे. यावर्षी निकाल लागण्यासाठी सरकार शर्थीचे प्रयत्न करणार आहे. राज्यातील 29 महागनरपालिका, 257 नगरपालिका, 26 जिल्हा परिषद आणि 289 पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष आहे. तसेच, राजकीय पक्षांनीही मोर्चेबांधणी सुरू केली असून पक्षाचे मेळावे व बैठकांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना बळ दिलं जात आहे.

# शिवलिंग मोराळेच्या वडिलांचा प्रताप

## ड्राय डेला दारू विक्री!

बीड : मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख (Santosh Deshmukh Case) यांच्या हत्याप्रकरणानंतर बीड (Beed) जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण प्रचंड ढवळून निघाले आहे.

दरम्यान,सरपंच देशमुख यांच्या हत्येनंतर जिल्ह्यातून अनेक गुन्हेगारीच्या घटनाही आता उजेडात येऊ लागल्या आहेत. अशातच पुण्यातील सीआयडी (CID) कार्यालयात 31 डिसेंबर रोजी वाल्मिक कराडला (Walmik karad) आपल्या स्वतःच्या स्कॉर्पिओ गाडीत ड्रॉप करणारा शिवलिंग मोराळे (Shivling Morale) चर्चेत आला होता. त्यानंतर त्याच्या अडचणीत वाढ झाली. आता शिवलिंग मोराळेच्या (Shivling Morale) वडिलांचा प्रताप ही समोर आला असून ड्राय डेच्या दिवशी शिवलिंग मोराळे याचे वडील पांडुरंग मोराळे हे देशी दारू विक्री करताना पकडले गेले आहेत.

बियर बारमधूनच दारू विक्री? कारवाईच्या भीतीने जागा बदलल्याची चर्चा


पुढे आलेल्या माहितीनुसार, शिवलिंग मोराळे याचे वडील पांडुरंग मोराळे यांच्यासह आणखी एका तरुणावर नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. शिवलिंग मोराळेचे बीड तालुक्यात अनेक बियर बार आहेत. अशातच 26 जानेवारी रोजी ड्राय डे असताना निवडुंगवाडी परिसरात बिअर बारच्या मागे देशी दारू विक्री करताना त्याचे वडील पांडुरंग मोराळे आणि सचिन बुकतुरे हे दोघे आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडील दारू जप्त करून या दोघांना ताब्यात घेतले. मात्र ही दारू बियर बार मधूनच विक्री केली जात होती. परंतु लायसन रद्द होण्याच्या भीतीने पोलिसांच्या माध्यमातून या कारवाईची जागा बदलल्याची चर्चा सुरू आहे.

दरम्यान, सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर खंडणी प्रकरणात व मकोका अंतर्गत अटक करण्यात आलेल्या वाल्मिक कराड आणि एका महिला पोलीस अधिकारी यांच्यातील फोनवरील संभाषणाचा कथित ऑडिओ व्हायरल झाला आहे. बीडमधील सायबर सेलच्या निशिगंधा खुळे आणि वाल्मिक कराड यांच्यातील हे संभाषण असल्याचे बोललं जात आहे.

# आडनावाऐवजी एकमेकांना फक्त नावाने हाक मारा

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर बीडमधील राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. बीड पोलिसमध्ये एका जातीचे कर्मचारी असल्याचा दावा करण्यात आला होता. तसेच हे कर्मचारी आरोपींना मदत करत असल्याचा आरोपी झाला. त्यामुळे या जातीयवादाला सुरंग लावण्यासाठी बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यातील पोलिसांसाठी आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार बीडमधील पोलिस कर्मचाऱ्यांना एकमेकांना आडनावाने नाही, तर नावाने हाका मारणे बंधनकारक करण्यात आले आहे.

संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर मराठा आणि वंजारी असा वाद निर्माण झाला होता. वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई झाल्यानंतरही एका विशिष्ट समाजाला टार्गेट केल्याचा आरोप करण्यात आला होता. तर, बीड पोलिस दल आणि इतर सरकारी विभागात एकाच समाजातील अधिकारी, कर्मचारी असल्याचा दावा करण्यात आल होता. या पार्श्वभूमीवर बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी मंगळवारी आदेश जारी केला.



## बीडमध्ये पोलिसांना आदेश, जातीयवाद कमी करण्यासाठी पोलिस अधीक्षकांचा पुढाकार

### नवनीत कॉवतांनी आदेशात काय म्हटले?

सामाजिक घटकांबरोबरच पोलिस दलातील सलोखा कायम ठेवण्यासाठी आणि मतभेद व मनभेद टाळण्यासाठी पोलिस अधीक्षकांनी पुढाकार घेतला आहे. यापुढे पोलिसांनी एकमेकांना फक्त पहिल्या नावानेच बोलवायचे, आडनाव घ्यायचे नाही, असे या आदेशात म्हटले आहे. आडनावातून जात, धर्म ओळखता येत असेल तर, ही ओळख हळूहळू पुसावी लागेल. आपण असे वागलो तर, समाजही अनुकरण करेल. असे कॉवत यांनी या जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या या आदेशाचे आता काय पडसाद उमटतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# कृष्णा आंधळेसोबत काही वाईट झाले असेल:संदीप क्षीरसागरांना संशय

## म्हणाले - त्या भागातला गायब झालेला माणूस पुन्हा भेटत नाही

कृष्णा आंधळे आता भेटेल असे मला काही वाटत नाही. त्या भागाचा जो काही जुना इतिहास आहे, ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले अन् ते अंगलट आले ती लोकं परत दिसतच नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

संदीप क्षीरसागर पुढे बोलताना म्हणाले की, जवळपास 50 दिवस झाले तो व्यक्ती पोलिस प्रशासनाला भेटत नाही. पोलिसांनी ठरवले तर कुठूनही त्याला शोधून आणले असते, त्यामुळे त्याच्यासोबत काही वाईट झाले आहे असा मला संशय असल्याचे आमदार क्षीरसागर यांनी म्हटले आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील एकमेव फरार आरोपी कृष्णा आंधळे याला बीड पोलिसांनी वॉन्टेड म्हणून घोषित केले आहे. पोलिसांनी त्याची माहिती देणाऱ्यास योग्य ते बक्षीस देण्याचीही घोषणा केली आहे. यात आता संदीप क्षीरसागर यांनी अजित पवारांची भेट घेतल्यानंतर केलेल्या दाव्यामुळे चर्चांना उधाण आले आहे.

..तर मुंडेंना राजीनामा द्यावाच लागेल

संदीप क्षीरसागर म्हणाले की, मी अजित पवारांना ज्या ज्या वेळी भेटतो तेव्हा दादा मला सांगत असतात की जो कुणी ह्या प्रकरणात गुन्हेगारांना मदत करणार किंवा प्रशासकीय कामात अडथळा निर्माण करणार त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई होणारच आहे. अजित पवार यांचा स्वभाव मला माहिती आहे त्यातून जर धनंजय मुंडेंच्या विरोधात काही पुरावे सापडले तर त्यांना राजीनामा द्यावाच लागेल.



कृष्णा आंधळेची माहिती द्या, बक्षीस घ्या

बीड पोलिसांनी कृष्णा आंधळेला वॉन्टेड घोषित केले आहे. कृष्णा आंधळेचा कुणाला ठावठिकाणा लागला तर त्याची तत्काळ माहिती बीड पोलिसांना देण्यात यावी असे आवाहन पोलिसांनी केले आहे. विशेषतः पोलिसांनी या प्रकरणी माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवून संबंधिताला योग्य ते बक्षीस देण्याचीही घोषणा केली आहे. यामुळे कृष्णा आंधळेला लवकरच बेड्या ठोकण्यात यश येईल असा दावा केला जात आहे.

अंजली दमानियांनी घेतली अजित पवारांची भेट

बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा वाल्मीक कराडला अटक करण्यात आली आहे. मात्र आता धनंजय मुंडे यांचा देखील राजीनामा घेण्यात यावा अशी मागणी केली जात आहे. याच संदर्भात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची देवगिरि बंगल्यावर जाऊन भेट घेतली आहे. अंजली दमानिया यांनी सर्व पुरावे अजित पवारांना दाखवले आहे. सर्व पुरावे बारकाईने बघून अजित पवार यांनी मंगळवारी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घेईल, असे अजित पवार यांनी आश्वासन दिले असल्याची माहिती अंजली दमानिया यांनी दिली आहे.

मुंडेंचा राजीनामा घ्याच

अजित पवार यांच्या भेटीनंतर अंजली दमानिया यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, जवळ जवळ 25 ते 30 मिनिटे आमची भेट झाली. त्यांचे म्हणणे आहे की बीडमध्ये जे काही झाले आहे त्याचे मी अजिबात समर्थन करत नाही. मग माझे तेच म्हणणे आहे की तुम्ही राजीनामा का घेत नाही. तुम्ही पुरावे म्हणत होतात न, मी सगळेच्या सगळे पुरावे घेऊन त्यांना भेटायला गेले आणि आज मी त्यांना दाखवले की कसे धनंजय मुंडे, राजश्री मुंडे आणि वाल्मीक कराड यांचे एकत्र बिझनेस कसे आहेत, त्यांच्या कंपन्यांमध्ये आर्थिक तफा कसा मिळत आहे आणि कसे हे ऑफिस ऑफ प्रॉफिटमध्ये बसत आहे. म्हणून तुम्ही कुठल्याही परिस्थितीत त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे.

# बीड पुन्हा हादरलं! बेपत्ता असलेल्या एसटी वाहकाचा सापडला मृतदेह

Beed News | राज्य परिवहन महामंडळाच्या (ST Mahamandal) माजलगाव आगारात (Majalgaon Depot) वाहक म्हणून कार्यरत असलेल्या दत्ता अंबलकर (Datta Ambalkar) यांनी २६ जानेवारीच्या मध्यरात्री शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. तिकीट न घेता प्रवास करणाऱ्या प्रवाशामुळे निलंबनाची कारवाई झाल्याने अंबलकर तणावाखाली होते, अशी माहिती समोर आली आहे.चिंचाळा (Chinchala) येथील रहिवासी असलेले दत्ता अंबलकर हे मागील दहा वर्षांपासून माजलगाव आगारात वाहक म्हणून कार्यरत होते. गेल्या महिन्यात एका प्रवाशाने तिकीट न घेता प्रवास केल्याप्रकरणी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. या कारवाईमुळे ते तणावात होते. त्यानंतर १२ जानेवारीपासून ते कोणालाही न सांगता घरातून निघून गेले होते.

बेपत्ता झाल्यानंतर शोध सुरू



अंबलकर बेपत्ता झाल्यानंतर त्यांच्या वडिलांनी माजलगाव पोलीस ठाण्यात (Majalgaon Police Station) मिसिंगची तक्रार दाखल केली होती. पोलीस त्यांचा शोध घेत होते. अखेर २६ जानेवारीच्या मध्यरात्री अंबलकर यांनी आपल्या शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळी त्यांचे वडील शेतात गेल्यानंतर ही धक्कादायक घटना उघडकीस आली.

अंबलकर यांच्या आत्महत्येची माहिती मिळताच वडवणी पोलिसांनी (Wadwani Police) घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा केल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी कुप्पा (Kuppa) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवण्यात आला. नातेवाईकांचा मृतदेह ताब्यात घेण्यास नकार शवविच्छेदन झाल्यानंतर काही काळ अंबलकर यांच्या नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला. त्यामुळे आरोग्य केंद्रात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यानंतर माजलगाव बस स्थानकाचे आगार प्रमुख कोळपकर (Kolpakar) आणि इतर कर्मचाऱ्यांनी कुप्पा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात धाव घेतली. त्यांनी अंबलकर यांच्या नातेवाईकांची समजूत काढली.कुटुंबातील एका व्यक्तीला महामंडळात नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास चिंचाळा येथे अंबलकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# धनंजय मुंडेंचा कंठ दाटला, विरोधकांचा आरोप जिव्हारी

मुंबई: मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात विरोधकांच्या निशाण्यावर असलेले राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी आज कॅबिनेट बैठकीला हजेरी लावली. मंत्रिमंडळ बैठकीनंतर धनंजय मुंडे यांनी माध्यामांशी संवाद साधला. यावेळी एका प्रश्नाला उत्तर देताना धनंजय मुंडे भावूक झाल्याचे दिसून आले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय समजले जाणारे वाल्मिक कराड यांना मकोका अंतर्गत पोलिसांनी अटक केली आहे. कराड यांना या प्रकरणाशी संबंधित खंडणीच्या गुन्ह्यात शरणागतीनंतर अटक करण्यात आली होती. त्याशिवाय, देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी हे कराड यांचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे धनंजय मुंडे हे विरोधकांच्या निशाण्यावर आलेत. मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. धनंजय मुंडे यांना विरोधकांनी चांगलेच घेरले आहे.

धनंजय मुंडे यांनी म्हटले की, राजीनामा या विषयावर मी काही उत्तर देणार नाही. अंजली दमानिया या अजितदादांना भेटल्या. यावेळी त्यांनी काही कागदपत्रे दाखवली. जे काही पुरावे दाखवलेत त्यावर अजित दादा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्पष्ट उत्तर देतील अशी माझी अपेक्षा असल्याचेही धनंजय मुंडे यांनी सांगितले.

संपादकीय

# राणाचे प्रत्यार्पण

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी (२६/११) झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील दोषी तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणाचा मार्ग अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मोकळा केला आहे. त्याला भारतात आणून उर्वरित कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन निवाडा होऊ शकेल. १६६ निरपराधांचा प्राण घेणाऱ्या या दहशतवादी हल्ल्याने केवळ भारतच नव्हे, तर जग हादरले होते. या हल्ल्याचा कट पाकिस्तानात शिजला होता.

'लष्कर-ए-तैयबा' या तेथील दहशतवादी संघटनेने हे कारस्थान रचले. पाकिस्तानी लष्करातील काही अधिकाऱ्यांनी त्यासाठी आवश्यक ती रसद पुरविली होती. हल्ल्याच्या पूर्वी 'लष्कर'शी संबंधित दहशतवाद्यांनी मुंबईत येऊन पाहणी केली होती. या हल्ल्याच्या मुख्य सूत्रधारांपैकी असलेला डेव्हिड कोलमन हेडली हा त्यांपैकीच एक. तहव्वूर राणा हा त्याचा साथीदार. मुंबई हल्ल्यासाठी लागणारी साधनसामग्री राणाने 'लष्कर'ला पुरविली, त्याने सुरू केलेल्या कार्यालयाचा कर्मचारी म्हणून हेडली मुंबईत येऊन गेला होता.

२६/११चा कट रचण्यात आणि तो प्रत्यक्षात आणण्यात राणाचा सहभाग असल्याचे आरोपपत्र राष्ट्रीय तपास संस्थेने सादर केले होते. मुंबई हल्ला, तसेच डॅनिश वृत्तपत्रावरील हल्ला या प्रकरणांत अमेरिकेतील तपास यंत्रणांनी राणाला २०११मध्ये अटक केले होते. तेव्हापासून राणाला भारतात आणण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. मात्र, आपले भारताकडे प्रत्यार्पण होऊ नये, यासाठी राणा कायदेशीर डावपेच खेळत होता. याबाबतची त्याची याचिका अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली असून, त्याला भारतात आणण्यात कोणतीही आडकाठी नाही. सध्या लॉस एंजेलिस येथे असलेल्या राणाला आपल्या ताब्यात घेण्यासाठीची तयारी भारतीय यंत्रणांनी केली असून, लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक तुकडी तिथे रवाना होणार आहे.

राणाच्या प्रत्यार्पणासाठी गेल्या चार वर्षांत सकारात्मक घटना घडल्या. जो बायडेन अध्यक्ष असताना त्यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन यांनी यासाठी पुढचे पाऊल टाकले होते. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल आणि सुलिव्हन यांच्यात या महिन्याच्या सुरुवातीलाही याबाबत बैठक झाली होती. राणावरील कायदेशीर प्रक्रिया, तसेच त्याला कोणत्या तुरुंगात ठेवणार, तिथे कैद्यांना कसे वागविले जाते, त्यांच्या मानवाधिकारांचे पालन केले जाते काय, तुरुंगातील वैद्यकीय सुविधा, राणाला हवी असलेली कायदेशीर मदत आदींबाबतची विचारणा अमेरिकेकडून होत होती.

भारतात आपला छळ केला जाईल, तुरुंगात वाईट वागणूक दिली जाईल, अशी भीती राणा सतत व्यक्त करीत होता; तसेच शिकागो येथील न्यायालयाने २६/११ प्रकरणी आपली निर्दोष मुक्तता केल्याचा युक्तिवादही तो करीत होता. मात्र, अमेरिकेत सुनावणी न झालेल्या गुन्ह्यांबाबत भारतात सुनावणी होणार असल्याचा मुद्दा अमेरिकेच्या सॉलिसिटर जनरल यांनी मांडला होता. त्यामुळे त्याच्या युक्तिवादातील पोकळपणा उघड झाला. भारतात आपल्याला दोषी ठरवून मृत्युदंडाची शिक्षा सुनावली जाईल, अशी भीतीही राणाने व्यक्त केली होती. त्याची ही भीती म्हणजे एक प्रकारे गुन्ह्यातील सहभाग मान्य करणारी ठरते. भारतातील प्रत्यार्पणासाठी राणाने दिलेली सर्व कारणे अशा रीतीने रद्दबातल ठरली. त्याला भारतात आणल्यानंतर मुंबई हल्ल्यामागील कटावर नव्याने प्रकाश पडू शकेल.

मूळ पाकिस्तानी असलेला राणा हा नव्वदच्या दशकात तेथील लष्करात डॉक्टर होता. तिथून तो कॅनडात गेला आणि तेथील नागरिकही बनला. मात्र, नंतर तो अमेरिकेत गेला आणि तिथे त्याने सल्लासेवा कंपनी स्थापन केली. याच कंपनीचा कर्मचारी म्हणून डेव्हिड हेडली मुंबईत येऊन गेला होता. मुंबई हल्ल्यातील अनेक धागेदोरे अशा प्रकारे राणापर्यंत येऊन थांबतात. त्यामुळे त्याच्या चौकशीतून हल्ल्याच्या कटातील त्याच्या सहभागाचा तपशील समोर येईलच; परंतु पाकिस्तानच्या सहभागाबाबत नवीन माहिती मिळू शकेल. या हल्ल्याचे कारस्थान शिजविण्यासाठी पाकिस्तानी यंत्रणांनी त्यांच्या देशाचा वापर तर करू दिलाच; परंतु दहशतवाद्यांना सर्व प्रकारची मदतही केली. तरीही या हल्ल्याशी आपला काहीही संबंध नसल्याचा साळसूदपणा पाकिस्तान दाखवित आला आहे.

या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार 'लष्कर'चा म्होरक्या हफिज सईद तिथे उजळ माथ्याने वावरतो आहे. दहशतवाद्यांचे भरण पोषण करून त्यांच्या मदतीने भारताच्या विरोधात छुपे युद्ध सुरू केलेल्या पाकिस्तानने २६/११ द्वारे भारताच्या आर्थिक केंद्रावर हल्ला केला. या हल्ल्यानंतर दोन्ही देशांतील संबंध जे बिघडले ते आजपर्यंत सुधारू शकले नाहीत. २६/११नंतरही पाकिस्तानने पुलवामा, पठाणकोट येथे दहशतवादी हल्ले केले. जम्मू भागात पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी हल्ले अद्याप थांबलेले नाहीत. पाकिस्तानचा क्रूर चेहरा अधोरेखित करण्यासाठी राणाला भारतात आणून पुढील कायदेशीर कारवाई लवकर होणे आवश्यक आहे.

## टीसी हरवला आहे

प्रिती महावीर अडागळे रा. पाटोदा ता. पाटोदा जिल्हा बीड यांचा १२ वी पास चा T.C पाटोदा ते जामखेड प्रवास दरम्यान हरवला आहे.

:: सापडल्यास संपर्क ::
मो. ७७०९७८७४०३

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चोळाखा येथील सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचे सादरीकरण

## मुख्याध्यापिका सौ वैशाली स्वामी यांचे अनमोल मार्गदर्शनाने स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

धर्माबाद /प्रतिनिधी

तालुक्यातील जरीकोट केंद्र अंतर्गत जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेल आनंद आयोजन करण्यात आले.२६ जानेवारी रोजी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थित पालक व प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोळा का शाळेतील विद्यार्थ्यांची सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी सहशालेय उपक्रम म्हणून वार्षिक स्नेहसंमेलन दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दत्त मंदिर संस्थानचे मठाधिपतीअनंतपुरी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सभापती दत्ता हरी पाटील चोळा



खेकर सौ गोदावरी दत्ता हरी पाटील, विठ्ठलराव पाटील,डी बी पाटील,दत्ता हरी मोरे,श्याम कदम,दत्ता हरी कदम,दीपक पाटील, भाऊसाहेब कदम,बाबू पाटील, चंद्रकांत कदम, दिगंबर कदम,शिवाजी पाटील,आनंदा कदम, परसराम सरकार,बालाजी पाटील, उपसरपंच अनिल रमेश कदम,ग्रामसेवक देव के शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष साईनाथ कदम सूत्रसंचालन धनराज कदम सहशिक्षक पल्लेवाड सर शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली स्वामी यांची उपस्थिती होती.यावेळी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमातश्री गणेश वंदनात शिवन्या, शिवराज, स्वराज,लोकेश, तेजू,रचना, दत्तराज,

ए. वतन ए वतन देशभक्तीपर गीतातून लोकेश, स्वराज, शिवराज,नाच रे मोरा आंब्याच्या वनात.. नंदिनी, रचना, शिवन्या, लक्ष्मी, तेजू, पुष्पा टू... संस्कृती, रचना,शिवण्याया, विद्यार्थ्यांनी गावातील पुरुष व महिला अलोट गर्दी झाली होती. लहान मुलांच्या कला गुणाकडे पाहून सर्वप्रेक्षकांनी मनमुराद आनंद लुटला.

# नगरसेवक शेख जमील सौदागर महाराष्ट्र उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित

घनसावंगी : घनसावंगी नगरपंचायतचे नगरसेवक शेख जमील सौदागर व त्यांचे चिरंजीव सौदागर ट्रेडर्सचे संचालक सोहेल जमील सौदागर यांचा नुकताच नाशिक येथे सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री तेजस्विनी पंडित यांच्या हस्ते महाराष्ट्र उद्योग रत्न २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रिसीट डॉट इन आणि समाचार वाणी या संस्थेच्या वतीने दरवर्षी उद्योगांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींची निवड करून त्यांचा गुणगौरव करण्यात येतो, या वर्षीचा महाराष्ट्र रत्न पुरस्कार घनसावंगी येथील शेख जमील सौदागर आणि त्यांचे




चिरंजीव शेख सोहेल सौदागर यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार देण्यात आला आहे.

या बद्दल त्यांचे नातेवाईक व मित्र परिवार घनसावंगी सह परिसरात त्यांचे अभिनंदन होत आहे.

# गोवर्धन पवार यांना उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार

बीड दिनांक (२७) शहरातील यशवंत विद्यालय या शाळेचे सामाजिक शास्त्र व क्रीडा विभागाचे शिक्षक गोवर्धन नवनाथराव पवार यांना भूगोल प्रज्ञाशोध केंद्र नवी मुंबई या संस्थेमार्फत दरवर्षी दिला जाणारा उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. गोवर्धन पवार हे आपल्या सामाजिक शास्त्र या विषयांमध्ये नेहमी सक्रिय असतात. तसेच ते भूगोल या विषयासाठी नवनवीन उपक्रम आयोजित करतात. स्पर्धा परीक्षा बद्दल विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन रुजवावा व स्पर्धा परीक्षेची भीती विद्यार्थ्यांमध्ये राहू नये यासाठी प्रयत्न करतात. राज्यामध्ये जे शिक्षक भूगोल विषया विषयी जनजागृती करून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करतात त्या शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो. या निमित्ताने या संस्थेमार्फत २०२४ चा पुरस्कार गोवर्धन नवनाथराव पवार यांना जाहीर करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी रोटरी



क्लब बीड मिडटाऊन चे अध्यक्ष नितीनजी गोपन, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश वाघ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक धुमाळ एम.एस.,कार्यकारी अभियंता सुधाकर बाहेरगव्हाणकर या मान्यवरांच्या हस्ते गोवर्धन नवनाथराव पवार यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे यांच्या घरी हळदी कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील ज्येष्ठ नेते तथा भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा देव देश आणि धर्म या कार्यासाठी अहोरात्र परिश्रम करून सर्वांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होणारे व प्रत्येक धर्म कार्यामध्ये अतिशय मोलाचा वाटा उचलणारे मग अखंड हरिनाम सप्ताह असो किंवा श्रीमद् भागवत कथा असो किंवा श्री गुरुचरित्र पारायण सोहळा असो या सर्व धार्मिक कार्यामध्ये ते सातत्याने धार्मिक सेवा करून प्रत्येक ठिकाणी ते आर्थिक मोठी धर्मासाठी मदत ही करतात.

एक ठिकाणी श्री संत तुकाराम महाराज देखील सांगतात की सत्य कर्मा व्हावे सहाय्य घातलीय भय नरका जाणे या संत वचनाप्रमाणे या प्रमाणे म्हणून या वर्षी देखील मकर संक्रांतीच्या पर्व काळावर त्यांनी त्यांच्या निवासस्थानी म्हणजेच

ओम नमो सदन या निवासस्थानी बीड शहरातील सर्व सुवासनी महिलांसाठी हळदी कुंकवाचा महोत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला गेली २५ वर्षापासून ही परंपरा हळदी कुंकवाची नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांच्या निवासस्थानी हळदी कुंकवाचा हा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अत्यंत मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणाच्या जल्लोषात हा महोत्सव साजरा करण्यात आला यावेळी महिलांचे औक्षण सौं रुक्मिणी बाई नवनाथ शिराळे व मालन गोरख शिराळे सोनम गोविंद शिराळे श्रावणी कृष्ण शिराळे ऋतुजा गणेश शिराळे या महिला भगिनींनी सर्व महिलांना हळदी कुंकवाच्या निमित्ताने एक वाण ववसा म्हणून एक श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा श्री हरिपाठ पवित्र ग्रंथ येथे उपस्थित असलेल्या सर्व महिलांना वान ववसा म्हणून वाटप करण्यात आले याच बरोबर महिलांना चहापाण्याऐवजी उसाचा थंडगार उत्कृष्ट आणि चवदार चांगल्या उसाचा रस महिलांना व लाहन बाळांना रसाचे वाटप या वेळी करण्यात आलं हजारो महिलांची या वेळी या महोत्सवामध्ये आपली आपली हजेरी लावून हा आनंद उत्सव साजरा करण्यात आला या वेळी जिजाऊ नगर धांडे नगर लक्ष्मण नगर गणेश नगर फुलेनगर माळे गल्ली शिराळे गल्ली धांडे गल्ली पिंगळे गल्ली शिवाजीनगर परिसरातील शिवराज नगर परिसरातील शिराळे नगर येथील सर्व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती या उत्कृष्ट कार्यक्रमाचे आणि निवेदन करणाऱ्या नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या परिवाराचे सर्व बीड शहरातील महिला भगिनींमधून कौतुक होत आहे असेच जर वाल पावसा हा धर्मग्रंथ देऊन मग श्रीमत भगवद्गीता असो किंवा ज्ञानेश्वरी असो किंवा हरिपाठ असो असे वेगळे वेगळे धर्मग्रंथ प्रत्येक वर्षी संक्रांतीच्या पर्व काळामध्ये सर्वत्र प्रत्येकाने आपापल्या घरी अण्णा शिराळे पाटील परिवाराचा म्हणजेच अण्णा प्रत्येक वेळी आपल्या प्रसिद्धी पत्रकामध्ये सांगत असतात की देव देश आणि धर्म या साठी प्रत्येकाने आपापले कर्तव्य म्हणून धर्मासाठी देशासाठी आणि देवासाठी कार्य केले पाहिजे हाच शिराळे पाटील परिवाराचा आदर्श बीड शहरातील इतरांनी घेऊन असा



कार्यक्रम हळदी कुंकवाचा जर राबवला तर नक्कीच धार्मिक कार्यामध्ये वृद्धी होऊन प्रत्येक जण आपापल्या परीने परमार्थ केल्याशिवाय आणि दिलेल्या धर्मग्रंथाचे अध्ययन केल्याशिवाय राहणार नाही असेही बोलले जात आहे.

## जाहिर प्रगटन

**मा. श्री.व्ही.सी.जोशी सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३५/२०२५ ॲड.जे.डी.पांडव यांच्या मार्फत**

मंगला बंडोपंत कोडगुले वि. निरंक

ज्यापेक्षा बंडोपंत रघुनाथ कोडगुले, हे दिनांक ०३.११.२०२४ रोजी पुणे येथे, ता.जि. पुणे येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१.मंगला बंडोपंत कोडगुले, वय-७८ वर्षे, धदा : घरकाम, रा.गुरूकृपा हाऊसिंग सोसायटी, नवगण कॉलेज ग्रेड, बीड ता.जि.बीड.

२.उदय बंडोपंत कोडगुले, वय-८८ वर्षे, धंदा : नौकरी, रा.गुरुकृपा हाऊसिंग सोसायटी, नवगण कॉलेज ग्रेड, बीड ता.जि.बीड, ह.मु. प्लॉट डी-११०६ थ्री ज्वेल्स सोसायटी, हवटाऊन कन्ड्रीऊड याचे विरुध्द बाजूस, टिळेकर नगर, कोंडवा, पुणे- ८७

३.उमेश बंडोपंत कोडगुले, वय-४१ वर्षे, धंदा : नौकरी, रा.गुरूकृपा हाऊसिंग सोसायटी, नवगण कॉलेज ग्रेड, बीड ता.जि.बीड.

अर्जदार क्र.१ ही मयत नामे बंडोपंत रघुनाथ कोडगुले, यांची पत्नी असून, अर्जदार कं २ व ३ ही मयताचे मुले आहेत. मयताचे आई नामे इंदिरा रघुनाथ कोडगुले या दि. २९/१०/१९९८ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच मयताचे वडील नामे रघुनाथ हरी कोडगुले यांचे सुध्दा निधन झालेले आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच त्यांचा पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत बंडोपंत रघुनाथ कोडगुले, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २७/०२/२०२५ आहे.

आज दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर,**
**बीड**

# सलग तीन वर्षापासून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात आर.के. पब्लिक स्कूलचा प्रथम क्रमांक

## जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम येण्याची झाली हॅट्रिक

गेवराई /प्रतिनिधी

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक मानसिकता रुजविणे आणि कृती संशोधनात रुची निर्माण करणे, या उद्देशाने एनसीईआरटी , राज्य विज्ञान व गणित संस्था नागपूर, शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड, जिल्हा विज्ञान मंडळ, अध्यापक मंडळ व सिंधपणा पब्लिक स्कूलच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय तीन दिवसीय विज्ञान प्रदर्शन दिनांक २० जानेवारी ते २१ जानेवारी या कालावधीत संपन्न झाले. ५२ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात गेवराईच्या आर. के. पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ने बाजी मारली. इयत्ता नववीतील गोपाल जयराम नवले या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक पटकावला. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन ५० वे , ५१ वे , आणि ५२ वे या तीनही वर्षात आर के पब्लिक स्कूलने माध्यमिक गटातून प्रथम येण्याची परंपरा कायम ठेवत हॅट्रिक केली.

रेशीम शेतकरी संकटात ; विज्ञानाकडे नविन तंत्रज्ञान.

आज महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकरी संकटात सापडला आहे. रेशीम शेतकऱ्याला कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे? हवामान बदलत आहे आणि रेशीम उद्योगात रोगराई वाढत आहे , यामुळे रेशीम शेती धोक्यात येत आहे. पण हे शेतकऱ्यांवरील आव्हान पेलण्यासाठी आज विज्ञान आणि तंत्रज्ञान सज्ज आहे. आर के पब्लिक




स्कूलच्या वतीने नवीन तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यासाठी अत्यंत उपयोगी प्रयोग जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सादर केला. यामध्ये अल्ट्राव्हायोलेट रेडिएशन , रेशीम रीलिंग , मायक्रोऑरगॅनिझम रेजिस्टन्स जनुकांचा उपयोग करून नवीन तंत्रज्ञान विकसित केले.

विज्ञान शिक्षक: आर. के. पब्लिक स्कूल, गेवराई

आज विज्ञानाच्या युगात रेशीम उद्योगावर नविन तंत्रज्ञानाची निर्मिती करून शेतकऱ्यांना दिलासा देणारा प्रकल्प सादर केला. आज खरच विज्ञानाचा उपयोग करून नवीन तंत्रज्ञान निर्माण करून आपण आपले व्यवसाय , शेती आणि प्रत्येक क्षेत्रांतील आव्हानांना सामोरे जाऊ शकतो. अशा पद्धतीचा प्रयोग गोपालने ५२ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सादर केला. या प्रकल्पाची रचना आर. के. पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्रयोग शाळेत केली. तर या प्रयोगाला प्रा. कामराज चाळक ( विज्ञान शिक्षक - आर.के. पब्लिक स्कूल, गेवराई) यांनी मार्गदर्शन केले. सलग तीन वर्षापासून आर.के. पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज राज्यस्तरावर निवड होत असल्यामुळे शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड व जिल्हा विज्ञान मंडळयांच्या वतीने शाळेचे प्राचार्य प्रा. गणेश चाळक आणि इ .९ वी चा विद्यार्थी गोपाल नवले यांचा गौरव करण्यात आला.

पार्थ प्रतिष्ठान संस्थेच्या अध्यक्षा सौ.योगिता चाळक व संस्थापक सचिव आर.के. चाळक यांनी शुभेच्छांचा वर्षाव करत पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल सर्व आर.के. पब्लिक स्कूलच्या सर्व टीमचे जिल्हा स्तरावर वरून कौतुक करत शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# एक चूक तुम्हाला महागात पडू शकते-न्या.सौ. अर्चना गायकवाड मॅडम

## उद्याचे भविष्य उद्याचे वाहन चालक - चंद्रमोहन कृष्णा चिंतल



अंबड(प्रतिनिधी)

जालना जिल्ह्यात होत असलेल्या महिलां मुलींवर होणारे अन्याय अत्याचार विरोधात विधी सेवा प्राधिकरण व वकील संघ अंबड तसेच रस्ता सुरक्षा अभियान यांच्या संयुक्त विद्यामानानेअंबड शहरातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय येथे कायदेविषयक शिबिर घेण्यात आले शिबिरामध्ये विद्यार्थी विद्यार्थिनींना कायदेविषयक माहिती देण्यात आली त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना न्यायाधीश अर्चना गायकवाड मॅडम म्हणाल्या की तुमचे कॉलेज खूप चांगले आहे आपण त्यामध्ये चांगले शिक्षण घेतले पाहिजे आणि त्या शिक्षणाचा पुरेपूर फायदा व उपयोग करून घ्यावे तुम्ही शिक्षणामध्ये खूप पुढे जाऊ शकतात. आपल्याकडून छोट्या छोट्या चुका होतात त्या किती महागात पडू शकते हे देखील पाहिले गेले पाहिजे आपल्या वयापासून किमान १८ ते २५ वया मध्ये लैंगिक गुन्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. कोणतेही गोष्टी तुमच्या आयुष्यात येऊ देऊ नये जेणेकरून आपले आयुष्य उध्वस्त होऊ शकते त्याचे दुष्परिणाम नोकरी लागली की तुमचे चरित्र तपासलेले जाते की तुम्ही गुन्हेगार आहात का असे देखील पहिले जात आहे आणि आपल्याला त्याचा त्रास सहन करावा लागत आहे आणि आपले आयुष्य देखील बरबाद होऊ शकते याची आपण परिपूर्ण काळजी घेणे गरजेचे आहे. आजच्या युगात सोशल मीडिया चा आपण जास्त वापर करतो आणि त्याचा दुरुपयोग देखील केला जातो आणि नाईलाजाने आपल्याला कायद्याच्या चौकटीत उभे राहावे लागत असते यापूर्वी जुने कायदे होते ते आता बदलण्यात आले आहे खझउ नंतर इछ्छड झाली आहे नवीन कायद्यात खूप कठोर आणि शिक्षेचे प्रमाण जास्त वाढणार आहेत सगळ्या टेक्निकल गोष्टी त्यामध्ये आलेले आहेत त्याचा उपयोग गुन्हा करण्यासाठी करण्यात येत आहे. सध्या स्थितीत मुलींचे अपहरण, मुली पळून जाणे याचा देखील खूप प्रमाण वाढले आहे हे प्रमाण किमान १८ ते २५ वय वर्षात होत आहे त्यामध्ये मुलींना लव मध्ये जास्त प्रमाणात पडत असतात आणि आपले आयुष्य उध्वस्त करत असतात याकडे देखील मुलींनी जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे आपण जर लव मध्ये लक्ष न देता शिक्षणामध्ये लक्ष देणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि आपले ध्येय गाठणे हे देखील आवश्यक आहे. आपण जर आपल्या कॅरियर कडे लक्ष दिले तर आपल्याला खूप काही मिळू शकते आणि जर आपण लक्ष नाही दिले तर नाईलाजाने आपल्यावर गुन्हे देखील दाखल होऊ शकते. आपण अनेक अभिनेत्यांना आपले रॉयल हिरो म्हणतो परंतु ते रॉयल हिरो नसतात आपले रॉयल हिरो स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आहेत यांचे विचार मनात घेऊन आपण खूप पुढे जाऊ शकतो आणि आपले आयुष्य उज्वल करू शकतो.विधी सेवा समिती तथा वकील संघ अंबड व रस्ता सुरक्षा अभियान यांच्या संयुक्त विद्यामानाने अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती अंबड तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.एस.बी.गायधनी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायाधीश श्रीमती अर्चना गायकवाड मॅडम, दिवाणी व फौजदारी न्यायालय अंबड,चंद्रमोहन कृष्णा चिंतल सर .आर टी ओ जालना, विशाल खांबे सर.उपविपो अधिकारी, सतीश जाधव सर पो नि, आदिनाथ ढाकणे सर पोउपनि,सदावर्ते सर.जिल्हा वाहतूक शाखा जालना, जाधव सर आर टी ओ जालना, तालुका विधि सेवा समिती चे कर्मचारी ढोले मॅडम, ड.आशा गाडेकर मॅडम,विधी स्वयंसेवक नाजीम सय्यद , संजय खोरे , प्रशांत बागुल, पारस मैड, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय येथील प्राचार्य माणिक सानप,यांच्यासह सर्व स्टाफ व विध्यार्थी - विध्यार्थीनी उपस्थित होते.

---

## वारणीचे भास्कर केदार यांना मातृशोक



जिल्ह्याचे नेते माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब यांनी केदार परिवाराचे केले सांत्वन

मानूर /प्रतिनिधी ह्व

काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस भास्करराव केदार यांना मातृशोक झाला यांच्या मातोश्री छबुबाई बुवासाहेब केदार यांचे दिनांक २६/ १ /२०२५ रोजी निधन झाले त्यांचे सांत्वन करण्यासाठी जिल्ह्याचे माजी मंत्री नेते अशोकराव पाटील साहेब यांनी दिनांक २८/१/२०२५ रोजी त्यांच्या राहत्या घरी वारणी येथे येऊन त्यांची भेट घेतली व भास्करराव केदार व केदार परिवाराचे सांत्वन केले त्याप्रसंगी त्यांच्या समवेत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे, ज्येष्ठ नेते बिपिनचंद्र ठोंबरे साहेब, काँग्रेस पक्षाचे बीड तालुका अध्यक्ष गणेश दादा बजगुडे, काँग्रेस पक्षाचे शिरूर तालुका अध्यक्ष रमेश सानप,

सेवादल तालुका अध्यक्ष रामेश्वर शेळके, हरिभाऊ सावंत तालुका सरचिटणीस, अशोक केकान, विष्णू केदार सर, पोपटरावजी डोळे, विठ्ठल सर, डोळे श्रीराम, खेडकर सर, रवींद्र केदार सर उपस्थित होते

---

## मराठा आंदोलक मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्याची पुर्तता व उपोषण सोडवण्यासाठी

### उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना खा.डॉ.कल्याण काळे यांचे निवेदन

अंबड /प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे दि.२५ जानेवारी पासून मराठा आरक्षण आंदोलक मनोज दादा जरांगे पाटील व त्यांच्या सोबत १०४ मराठा बांधव आमरण उपोषणाला बसलेले असून मा .श्री.मनोज दादा जरांगे पाटील यांची प्रकृती खालावलेली आहे.मराठा समाजाच्या भावना तीव्र असुन असंतोष निर्माण झालेला आहे.मा.श्री.मनोज दादा जरांगे पाटील व १०४ मराठा बांधव यांच्या खालावत चाललेल्या प्रकृतीची दखल घेऊन व बांधवांसमवेत मराठा समाजाला आरक्षण व तदनुंषगिक मागण्याची पुर्तता होण्यासाठी सदरहून उपोषण तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक ती



कारवाई करण्यात यावी अशी विनंती करणारे निवेदन जालना जिल्ह्याचे खासदार डॉ.कल्याणराव काळे यांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना दिले.

---

## उपमुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत बुधवारी बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या विविध विषयांवर बैठकीचे आयोजन

### मंत्री धनंजय मुंडे यांच्या विनंतीवरून बैठकीचे आयोजन, सहकारमंत्री यांच्यासह मंत्री पंकजाताई मुंडे राहणार उपस्थित

**मुंबई (प्रतिनिधी)**

**मागील काही वर्षांपासून अडचणीत असलेल्या बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला आर्थिक मदत करून गतवैभव प्राप्त करून देण्याच्या अनुषंगाने बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या विविध विषयांवर बुधवारी (ता.२९) रोजी सकाळी ११.१५ वा. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सहकार विभागाने बैठकीचे आयोजन केले आहे.**

बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला आर्थिक मदत करून गतवैभव प्राप्त करून देणे त्याचबरोबर पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या धर्तीवर बीड जिल्ह्यातील शेतकरी वर्गाला कर्ज पुरवठा करणे यांसह विविध विषयांवर या बैठकीत चर्चा होऊन जिल्हा बँकेला



बूस्टर डोस मिळणे अपेक्षित आहे. राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांच्या विनंतीवरून या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीस सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांसह नियोजन व सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच व्हिसी द्वारे बीड जिल्हाधिकारी आणि जिल्हा बँकेचे प्रशासकीय मंडळ उपस्थित राहणार आहेत.मागील काही वर्षांपासून अडचणीत असलेल्या बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला या बैठकीच्या माध्यमातून आर्थिक बूस्टर मिळण्याची अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त केली जात आहे. दरम्यान बीड सोबतच नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या देखील विविध विषयांवर याच बैठकीत चर्चा होणार आहे.

---



एस .टी.भाडेवाढीच्या विरोधात ठाकरे शिवसेनेच्या वतीने ठाकरे स्टाईलने

## तीव्र आंदोलन संपन्न - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर ,परमेश्वर सातपुते

बीड / प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व संपर्कनेते सुनिलजी प्रभू साहेब, विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादाजी दानवे साहेब, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुळकर साहेब ,संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब ,व महिला आघाडीच्या जिल्हा संपर्कप्रमुख संपदाताई गडकरी , सहसंपर्कप्रमुख बदामराव अंबा पंडित ,यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली व उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले , तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन व महिला आघाडीच्या बीड विधानसभा संघटिका मीराताई नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत आंदोलन संपन्न झाले.

यावेळी बोलताना वरेकर व सातपुते म्हणाले की,एस.टी. हि गोरगरीबाची लालपरी असुन सर्वसामान्य लोकांना प्रवासाचे ते महत्त्वाचे साधन आहे, ग्रामीण भागातील लोकांना दळणवळणासाठी हि सेवा अत्यंत महत्त्वाची आहे परंतु महाराष्ट्राततील युतीच्या सरकारने निवडणुकीत नको त्या योजना काढल्या व मतदारांना आमिष दाखवून प्रचंड पैसा तिकडे वळवला मग आता सरकार चालवण्याची नामुष्की ओढवलयानंतर अनेक ठिकाणी भाववाढ करुन गोरगरीब लोकांच्या खिशाला कात्री लावली जात आहे अशाच पध्दतीने एस .टी. ची वारेमाप भाववाढ करण्यात आली आहे हि बाब पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या लक्षात आल्यावर संबंध महाराष्ट्रत आज चक्का जाम आंदोलन पुकारले आहे त्या अनुषंगाने आम्ही बीड बसस्थानकासमोर सर्व पदाधिकारी व शिवसैनिक यांना सोबत घेऊन हे आंदोलन केले आहे जर शासनाने भाववाढ रद्द केली नाही तर यापुढे तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा दोन्ही जिल्हाप्रमुखांनी दिला यावेळी जिल्हा सचिव श्रीकृष्ण गायके ,उपतालुकाप्रमुख अशोक सगळे, उपतालुकाप्रमुख प्रकाश धुताडमल , उपतालुकाप्रमुख दादासाहेब सोनवणे , तालुका संघटक शेख कलिमभाई ,आसाराम वैध ,भरत खरात ,विनोद गुंड पाटील ,अजय गुंड , भिमराव कुटे , सर्कलप्रमुख रमेश नवले ,बाळु वरेकर , माजी सरपंच सखाराम मोहिते ,दिपक घोडके ,बाबु कुटे , सुनिल शेळके ,बाळू कुटे ,अशोक काळे ,प्रसाद कुठे , चंद्रकांत बजगुडे ,राजेभाऊ नवले , दादा ढोले , रत्नाकर येवले यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक, महिला आघाडीच्या पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# बीडच्या सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी आ.क्षीरसागर अजितदादांकडे

## तातडीने कार्यवाही करण्याचे प्रधान सचिवांना अजितदादांचे निर्देश

बीड (प्रतिनिधी):- बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. याचसंदर्भात मंगळवारी (दि.२८) रोजीही आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली. यावर अजितदादांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांना तातडीने हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

मुबलक प्रमाणाय पाणीसाठा उपलब्ध असून देखील बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. पंधरा-पंधरा दिवसांतून एकदा पाणी बीड शहरवासीयांना मिळत आहे. याचे कारण म्हणजे सध्या जी पाणीपुरवठ्याची योजना कार्यरत आहे ती अपुरी पडत आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीनुसार पुरेशी असणारी अमृत अटल योजना काम पूर्ण होऊन उपलब्ध देखील आहे. परंतु बीड नगरपालिकेकडे ३६ कोटी रूपयांचे वीजबिल थकलेले असल्याने महावितरण विभाग या नवीन पाणीपुरवठा योजनेला वीज कनेक्शन देत नाही. परिणामी पाणी आणि योजना हे दोन्ही उपलब्ध असताना बीडकरांना पाण्यासाठी पंधरा-पंधरा दिवस वाट पहावी लागते. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा केलेला आहे आणि तो आताही सुरूच आहे. आ.क्षीरसागर यांनी अनेक वेळा अधिवेशनात हा प्रश्न मांडला आहे. अनेकवेळा सरकारदरबारी मंत्री महोदयांकडे बैठका घेऊन हा प्रश्न



लावण्यासाठी विनंती केली आहे. यासोबतच प्रशासकीय अधिकाऱ्यांकडेही याबाबतच्या बैठका घेऊन यात मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केले आहेत. शेवटी या विषयात आ.संदीप क्षीरसागर यांनी माजी आ.सय्यद सलीम यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात जनहित याचिका देखील दाखल केली होती.

आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न विधिमंडळ, मंत्रालय, प्रशासन आणि न्यायालय अशा सर्वच स्तरावर मांडला आहे. याबाबत सातत्याने पाठपुरावा केला आहे. आताही याच प्रश्नावर आ.संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली आहे. त्यावर ना.अजिदादांनीही लगेचच, बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी कार्यवाही करा, असे निर्देश नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम कुमार गुप्ता यांना दिले आहेत. आता ना.अजित दादा पवार यांच्या माध्यमातून बीड शहराचा गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागेलच अशी अपेक्षा आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान याप्रसंगी ना.हसन मुश्रीफ साहेब

---

## शिरूर येथे १२ फेब्रुवारी रोजी संत रविदास महाराज यांच्या जयंतीचे आयोजन

**मानूर/प्रतिनिधी ह्व**

**सालाबाद प्रमाणे याही वर्षी शिरूर शहरातील महात्मा फुले नगर येथे संत गुरू रविदास महाराज यांच्या जयंतीचे १२ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे.गेल्या वीस वर्षांपासून अविरतपणे संत रविदास महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत**

असून अंधश्रद्धा जन्माला घालणारी व्यवस्था संपविण्याचा जयंती साजरा करण्याचा उद्देश असल्याचे उत्सव समितीचे अध्यक्ष चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष छत्रपती साहेबराव नन्नवरे यांनी केले आहे.

---

## शारदा प्राथमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई शहरातील ताकडगाव रोड येथील शारदा प्राथमिक विद्या मंदिर शाळेची शैक्षणिक सहल दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी सहल घृष्णेश्वर, वेरूळ लेणी, देवगिरी किल्ला, खाटोड हुरडा पार्टी, वेरूळ लेण्या,सिद्धार्थ गार्डन, प्राणी संग्रहालय, सर्प उद्यान, मत्स्यालय, बीबी का मकबारा,इत्यादी स्थळी नेण्यात आली होती. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती.रोहिणी लाखोटे मॅडम, श्री.गरड सर यांच्या मार्गदर्शनाखाली ही शैक्षणिक सहल अतिशय आनंदी वातावरणात, सुरक्षितरीत्या,आयोजित करण्यात आली होती. शाळेच्या विद्यार्थ्यांना आपल्या महान प्राचीन भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांचे दर्शन, देशाच्या विविध भागात असणारे वेगवेगळे प्राणी, विविध प्रकारचे साप त्यांच्या प्रजाती, विविध लेण्या, कैलास मंदिर, दौलताबादचा किल्ला किल्ल्यावरील व तत्कालीन राज्यकारभाराची विविध ठिकाणे व साधने, विविध प्रकारच्या तोफा, तोफांचे प्रकार, मिनार, मराठवाडा मुक्ती संग्रामाचा जाज्वल्य इतिहास संग्रहालय, मुलांना खेळण्यासाठी असंख्य बाबी अशा अनेक वैविध्यपूर्णत बाबींनी विद्यार्थ्यांना अनुभव समृद्ध करणारी ठरली. विद्यार्थ्यांनी सर्व वैविध्यपूर्ण बाबींचा मनापासून आनंद घेतला. वाय.ए.पवार, दाभाडे सी.एल.पौळ,व्ही.एस.चोरमले, एल. आर.गायके, गरड टी.सी. गरड आदी




शिक्षक शिक्षिका यांनी सहलीचे आयोजन - नियोजन व यशस्वीपणे केल्याबद्दल शाळेच्या सर्व पालकांनी खूप कौतुक केले, आभार व्यक्त केले.

# पंतप्रधान घरकुल आवास योजनेचा मंजूर लाभार्थ्यांनी कागदपत्राची पूर्तता करून लाभ घ्यावा–आ.सुरेश धस

**आष्टी,पाटोदा,शिरूर कासार या तिन्ही तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना–ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत ११ हजार ९०० लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत**

गावनिहाय ग्रामपंचायत समोर मंजूर झालेल्या लाभार्थी यांच्या याद्या लावल्या असून लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

पंतप्रधान घरकुल योजना–ग्रामीण टप्पा –२ अंतर्गत घरकुल मंजुरी व पहिला हप्ता वितरणाचे काम हाती घेतले.प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मंजूर लाभार्थ्यांच्या मतदारसंघातील गावनिहाय यादी ग्रामपंचायत



कार्यालयासमोर लावण्यात आली आहे.यामध्ये आष्टी ६१५७,पाटोदा २९०२,शिरूर कासार २८०५ तिनी तालुक्यात घरकुले मंजूर झाले असून त्या यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.यासाठी ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा,आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे दोन दिवसात करावी. तात्काळ पुढच्या आठवड्या पर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये अनुदान जमा केले जाणार आहे. घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे दोन दिवसात जमा कराव्यात म्हणजे ऑनलाइन प्रणाली मार्फत घरकुल मंजुरी व लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा हप्ता वितरण जमा जाणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले आहे.

# आनंद शैक्षणिक संकुल,आष्टी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**मा.आ.भीमराव धोंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न**

आष्टी /प्रतिनिधी

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित आनंद शैक्षणिक संकुल,आष्टी येथे सर्व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने अन्नतंत्र महाविद्यालयाच्या प्रांगणावर ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.भिमराव धोंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

ध्वजारोहण झाल्यानंतर आनंद शैक्षणिक संकुलातील प्रत्येक महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य व नाटिका सादर केल्या. यावेळी संस्थेतर्फे पदवी गटातून प्रथम क्रमांक पटकावलेल्या महेश आयुर्वेद महाविद्यालयाच्या गीतास उत्कृष्ट सादरीकरणा करीता रु.२५००चे प्रथम , रु.२००० चे द्वितीय कृषी महाविद्यालयास, रु.१५०० चे तृतीय बक्षीस अन्नतंत्र महाविद्यालयास तर



पदविका महाविद्यालय गटातून प्रथम डी फार्मसी,द्वितीय नर्सिंग विद्यालय ,तृतीय तंत्रनिकेतन महाविद्यालय याप्रमाणे बक्षीसे देण्यात आली. या ध्वजारोहण कार्यक्रमास संस्थेचे सचिव डॉ. अजय दादा धोंडे, संचालक अभयराजे धोडे, श्री.राजेन्द्र धोंडे, ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे ,इंजिनिअर पांडुरंग बोडखे, श्री .शिवाजीराव थोरवे, प्रशासकिय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, श्री.माऊली बोडखे, श्री.संजय शेंडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आरसुळ एस.आर., बी फार्मसी डी फार्मसी व महेश पॅरामेडीकल कॉलेजचे प्राचार्य डॉ सुनिल कोल्हे, तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य संजय बोडखे, अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य श्री मोहळकर,बीपीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब खेमगर महेश आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत गोसावी, कृषी तंत्रनिकेतन चे प्राचार्य श्री.उद्धव घुले, पशुसंवर्धन विद्यालयाचे प्राचार्य श्री.किशोर टापरे, नर्सिंगचे विद्यालयाचे प्राचार्य श्री.सलमान खान, सर्व महाविद्यालयांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मिसाळ एल एस, प्राध्यापिका बनकर सुजाता यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ श्रीराम आरसुळ यांनी मानले.


# अंगणवाडीच्या विद्यार्थिनीचे शाळेच्या कार्यक्रमात नृत्य चिंचोटीच्या शाळेत समृद्धीने केला उत्तम डान्स

**महाराष्ट्रीयन वेशभूषा आणि भगवा ध्वज हातात घेऊन केलेलं नृत्य पाहून गावकरी आणि गुरुजनांनी केले तोंड भरून कौतुक**

वडवणी/प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचोटी जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.. या कार्यक्रमात गावातील अंगणवाडी मध्ये जाणारी चिमुकली कु. समृद्धी अशोक फपाळ या चार वर्षीय बालिकेने खूप सुंदर नृत्य सादर केले. तीचे या नृत्य पाहून शाळेतील सर्व शिक्षक आणि गावकऱ्यांनी तोंडभर कौतुक करीत टाळ्यांचा एकच कडकडाट केला.

चिंचोटी शाळेत दरवर्षी विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केलेलं असतं. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शाळेच्या वतीने विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात जिल्हा परिषद चिंचोटी शाळेतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी एकाहून एक असे कार्यक्रम सादर केले. शाळेच्या सर्व शिक्षकांनी मोठ्या मेहनतीने या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. मात्र याच कार्यक्रमात चिंचोटी येथील अंगणवाडीत शिक्षण घेणारी चार वर्षीय चिमुकली दाखल झाली. कु. समृद्धी अशोक फपाळ या चिमुकल्या बालिकेने आम्ही शिवकन्या या गीतावर सुंदर नृत्य केलं. छत्रपती शिवरायांची मी कन्या आहे आम्ही जिजाऊची लेक आहोत, आम्ही झाशीच्या राणी आहोत, अशा या गीताचा संदेश देत हातामध्ये भगवा



झेंडा घेऊन मुलींनी स्वसंरक्षणाचा असा बोध या गीतातून देत भगव्या झेंड्यावर आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीला जागृत करणारे नृत्य चिमुकल्या समृद्धीने सादर केलं. हे नृत्य पाहून शाळेतील सर्व शिक्षक आणि कार्यक्रम पाहण्यासाठी गावातून आलेल्या प्रेक्षक गावकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून तिचं कौतुक केलं. एवढ्या छोट्या वयात तिने केलेले नृत्य पाहून सर्वांनी कौतुक केलं. भावी काळात एक सुंदर नृत्यांगना होऊ शकते अशा शुभेच्छा तिला शाळेच्या शिक्षकांनी दिल्या. या कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय नांदे, सहशिक्षक गोवर्धन राऊत, तात्याराव गडदे, बापू धनवे, आशिष इंगळे, महेश घोळवे, संतोष देवकते, रमेश भोज, लक्ष्मीबाई गोंडे यांच्यासह गावातील सरपंच भागवत गोंडे, उपसरपंच गोविंद गोंडे, चेअरमन महादेव गोंडे, ज्येष्ठ पत्रकार रामेश्वर गोंडे, अशोक गोंडे, मुरली येळवे, चित्रपट दिग्दर्शक प्रा श्रीनिवास काकडे, दत्ता गोंडे, शालेय समितीचे अध्यक्ष सुसेन मायकर, उपाध्यक्ष सोनाजी गोंडे, शिक्षण प्रेमी नागरिक दिनकर गोंडे, समाधान काकडे, विनोद काकडे, रामचंद्र बादाडे, ग्रामपंचायत सदस्य साहेबराव गोंडे यांच्यासह गावातील सर्व नागरिकांनी तिला उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

गीताच्या निवडीबद्दल आई–वडिलांचे कौतुक.. चित्रपटातील धांगडधिंगा गीतावर नृत्य करण्यापेक्षा आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आणि महाराष्ट्रातील महापुरुष यांच्या विचाराला अभिवादन करणार हे गीत एका चिमुकलीसाठी निवडता आलं तिच्या या गीताच्या निवडीबद्दल तिचे वडील अशोक फपाळ आणि आई प्रतिभा फपाळ यांचेही उपस्थितांनी तोंड भरून कौतुक केलं सहशिक्षक इंगळे सर यांचे परिश्रम... चिंचोटी जिल्हा परिषद शाळेतील सहशिक्षक आशिष इंगळे सर यांनी मागील अनेक दिवसांपासून शाळेतील विद्यार्थ्यांना कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी परिश्रम घेतले कार्यक्रमातील सर्व नियोजन आणि



# गेवराईत माजी आ. लक्ष्मण पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळ वाटप

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराईचे माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण यांच्या पुढाकारातून उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे रुग्णांना फळ वाटप करुन सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण, माजी नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे, भरत गायकवाड, डॉ. राजेंद्र अंधळे, डॉ, लेंडगुळे, शेख निजामभाई, कमलाकर वखरे, बबनराव राठोड, दाऊदभाई पठाण, सय्यद हसनभाई, विलास गुंजाळ, बाबासाहेब सावंत, परमेश्वर राठोड, शंकर उबदे, सुंदर काकडे, कृष्णा पाटोळे, रंजीत कांबळे , भाऊसाहेब बेंद्रे, राणा कानडे, मगन परदेशी, प्रकाश उपळकर, शेख जहीरभाई सह आदी पदाधिकारी उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई) डिजिटल मिडिया च्या बीड जिल्हाअध्यक्ष पदी आमचे जिवलग मित्र तथा दैनिक प्रारंभ चे तालुका प्रतिनिधी तथा शिवमुद्रा प्रतिष्ठाण संस्थापक अध्यक्ष अनिल आगुंडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांना नियुक्ती पत्र देताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई) डिजिटल मिडिया चे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे दिसत आहेत.

# रायमोहा १२ वाड्या शिरूर कासार पोलीस ठाण्याला जोडा गोकुळ सानप या युवकाचा १० वर्षांपासून सुरु आहे लढा

रायमोहा–(प्रतिनिधी)

रायमोहा व परिसरातील १२ वाड्या या पाटोदा पोलीस ठाणे अंतर्गत येत असून किरकोळ अथवा गंभीर प्रकरणे असले की पाटोदा याठिकाणी जावे लागत असून ही गावे शिरूर कासार पोलीस ठाण्याला जोडण्यात यावी अशी मागणी घेऊन गोकुळ सानप या युवकाचा १० वर्षांपासून लढा चालू असून संबंधित विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन हा निर्णय घ्यावा अशी मागणी निवेदनात केली आहे.

रायमोहा व १२ वाड्या परिसराला कोर्ट शिरूर कासार व पोलीस ठाणे पाटोदा असल्याने जनतेला अडचणीचे ठरत असून याबाबत अनेकवेळा निवेदने देखील देण्यात आली असून याची कोणत्याही प्रकारची अद्यापपर्यंत



दखल घेतली नसल्याने जनता आंदोलन करण्याची पावित्र्यात आहे. तरी रायमोहा व १२ वाड्या परिसर पाटोदा पोलीस ठाण्याकडून काढून घेवून शिरूर कासार पोलीस ठाण्याला जोडण्यात यावा अशी मागणी गोकुळ सानप यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत व ईमेलव्दावारे लेखी निवेदन पाठवून केली आहे

# दिनेश वाघमारे यांनी स्वीकारला राज्य निवडणूक आयुक्तपदाचा पदभार

मुंबई (प्रतिनिधी)

राज्याचे माजी अपर मुख्य सचिव दिनेश वाघमारे यांनी आज राज्य निवडणूक आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी त्यांचे स्वागत केले.

राज्यपाल महोदयांनी श्री. वाघमारे यांची पाच वर्षांसाठी राज्य निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. त्यासंदर्भातील अधिसूचना २० जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध झाली होती. त्यानुसार त्यांनी आज राज्याचे सातवे राज्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला.

श्री. वाघमारे यांनी इलेक्ट्रॉनिक अभियांत्रिकीमध्ये बीटेक (१९८७) केले आहे. आयआयटी खरगपूरमधून त्यांनी संगणकशास्रात एमटेक (१९८९); तर यूकेमधून 'विकास व प्रकल्प नियोजन' या विषयात एमएस्सी (२००७) केले आहे. १९९४ च्या तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असलेले श्री. वाघमारे यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आहे.

रत्नागिरीचे सहायक जिल्हाधिकारी म्हणून श्री. वाघमारे यांच्या प्रशासकीय कारकीर्दीला सुरुवात झाली होती. वाशीम आणि यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारीपदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर त्यांनी बुलढाण्याचे जिल्हाधिकारीपद भूषविले होते. ते नागपूर सुधार प्रन्यासचे अध्यक्षही होते. विविध शासकीय महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, सदस्य सचिव; तसेच नवी मुंबई व पिंपरी– चिंचवड महानरपालिकेचे आयुक्त म्हणूनही ते कार्यरत होते. अमरावतीचे विभागीय आयुक्त म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. वैद्यकीय शिक्षण विभागासह सामाजिक न्याय, ऊर्जा, गृह इत्यादी विभागांतही त्यांनी विविध पदे भूषविली आहेत.

श्री. वाघमारे यांना स्कॉच अवॉर्ड, नवभारत गव्हर्नन्स अवॉर्ड, सीएसआर इंडिया २०२१ अवॉर्ड, पीएसयू अवॉर्ड फॉर डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन, ग्रीनटेक लीडिंग डायरेक्टर अवॉर्ड २०२१, सत्यन मित्रा नॅशनल अवॉर्ड इत्यादी पुरस्कारांनी वेळोवेळी गौरविण्यात आले आहे.

# तिरुपती हॉस्पिटल येथे डायलिसिस युनिट चा शुभारंभ

**आता सर्वसामान्यांना डायलिसिस करण्यासाठी ची गैरसोय होणार दूर**

**महात्मा ज्योतिबा फुले व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत होणार उपचार**

गेवराई /प्रतिनिधी

एखाद्या व्यक्तीची किडनी निकामी ठरल्यानंतर त्या रुग्णाला वाचविण्यासाठी डायलिसिस हा पर्याय उत्तम ठरतो. मशीनद्वारे रुग्णांच्या रक्तातील अशुद्ध घटक बाहेर फेकून शुद्ध रक्त शरीरात पुरविले जाते. ही मशीन किडनीसारखेच कृत्रिमरीत्या काम करते. किडनीग्रस्त रुग्ण हा डायलिसिस उपचार घेऊन १५ वर्षा पेक्षा जास्त काळ जगू शकतो. अशाच डायलिसिसची गरज असलेल्या सामान्य रुग्णांना आता बीड किंवा छत्रपती संभाजी नगर येथे जाण्याची गरज नाही गेवराई शहरातील डॉक्टर गोविंद लेंडगुळे यांच्या तिरुपती हॉस्पिटल येथे रुग्णालयांमध्ये डायलिसिस सेंटर्स उभारले आहे. दिनांक २०.१.२०२५ वार सोमवार रोजी गेवराई येथील प्रसिद्ध डॉ. विजय कुमार सिकची यांच्या हस्ते डायलिसिस युनिटचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बालाजी हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉक्टर गोविंद लेंडगुळे व डॉ. गायत्री



लेंडगुळे यांच्या सह तिरुपती हॉस्पिटल येथील सर्व कर्मचारी उपस्थित होते.सर्वसामान्यांच्या सेवेसाठी या ठिकाणी

डायलिसिस करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले,प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ही सुविधा करण्यात येणार आहे.अशी माहिती बालाजी हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉक्टर गोविंद लेंडगुळे व डॉ. गायत्री लेंडगुळे यांनी दिली आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# ध्येय निश्चित करा,यश मिळतेच- ॲड. अविनाश धायगुडे
## विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कारचे वितरण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

जोपर्यंत स्वतःचे ध्येय निश्चित करणार नाहीत तो पर्यंत पुढे जाता येणार नाही.यासाठी ध्येय निश्चित करा,यश मिळतेच.असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते ड. अविनाश धायगुडे यांनी केले.येथील जय भारती सेवाभावी प्रतिष्ठान व जाधव कोचिंग क्लासेस, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी आद्यकवी मुकुंदराज सभगरहात आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कारचे वितरण या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ड. अविनाश धायगुडे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा होते.तर मंचावर दाजीसाहेब लोमटे, रामकृष्ण पवार गुरुजी,जयभरती संस्थेचे अध्यक्ष ड.माधव जाधव,जाधव कोचिंग क्लासेसच्या संचालिका सौ.ज्योती जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना ड. अविनाश धायगुडे म्हणाले की विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता




### यांचा झाला पुरस्काराने सन्मान -:

विधीसेवा गौरव पुरस्कार.स्व. ॲड. अण्णासाहेब लोमटे स्मृति प्रित्यर्थ मा. ॲड. महाजर अली उस्मानी,समाजसेवा गौरव पुरस्कार स्व. द्वारकादासजी लोहिया स्मृति प्रित्यर्थ ॲड. संतोष पवार,आरोग्यसेवा गौरव पुरस्कारस्व. डॉ. व्यंकटराव डावळे स्मृति प्रित्यर्थ मा. डॉ. राकेश जाधव,पत्रकारिता गौरव पुरस्कार स्व. साधु गुरुजी स्मृति प्रित्यर्थ पत्रकार प्रशांत बर्दापूरकर,शिक्षणसेवा गौरव पुरस्कार स्व. एकनाथराव खेडगीकर उर्फ बेथुजी गुरुजी स्मृति प्रित्यर्थ दि.ना. फड यांना शाल, श्रीफळ,सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

ज्या क्षेत्रात आवड आहे.त्या विषयाला प्राधान्य द्यावे.आपले स्वप्न आपणच ठरवा व ते पूर्ण करा.मात्र यासाठी आयुष्यात प्लॅनिंग महत्वाचे आहे. मर्यादित राहू नका,तर आपल्या कक्षा उंचवा.असे आवाहन त्यांनी केले. आपल्या अध्यक्षीय समारोप करताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले की विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळाली की त्यांचा प्रवास योग्य दिशेने होतो. मात्र पालकांनी आपल्या अपेक्षा मुलांवर लादु नयेत.तर त्यांच्या आवडीच्या विषयावर त्यांना करीयर करण्याची संधी द्यावी. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कारचे वितरण शाल, श्रीफळ व सन्मानपत्र, देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ड माधव जाधव यांनी केले. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात मराठीभाषा संवर्धन पंधरवडा संपन्न

## मराठी भाषा ही ज्ञानभाषा व जागतिक भाषा झाली पाहिजे - वसुदेव बप्पा गायकवाड

केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज.जि.बीड येथे दि.१४ ते २८ जानेवारी २०२५ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेवून संपन्न झाला.दि.२८ जानेवारी २०२५ रोजी समारोप कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,ख्यातनाम वक्ते व व्याख्याते वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगन नाना गायकवाड,ग्रंथालयाचे सहसचिव ज्ञानोबा भोगजकर,दादासाहेब गायकवाड,दत्तात्रयकदम, ग्रामपंचायत सदस्य नारायण गायकवाड,सुरेश भोगसकरयांची उपस्थिती होती.सर्व मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीयसमारोप वसुदेव बप्पा




गायकवाड यांनी केला.मराठी भाषा ही ज्ञानभाषा व जागतीक भाषा झाली पाहिजे असे प्रतिपादन वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे,त्यामुळे आता मराठी भाषेच्या विकासासाठी भारत सरकार निधी मोठ्या प्रमाणात देईल,त्यामुळे मराठी साहित्यात मोठी भर पडेल,पण मराठी भाषा ही ज्ञान भाषा व जागतिक भाषा बनली पाहिजे यासाठी मराठी भाषीक म्हणून आपणा सर्व मराठी भाषिकांना जाणीवपूर्वक प्रयत्न करावालागेल.आपल्याला मराठीतले ज्ञान,तत्वज्ञान वृद्धिंगत करावे लागेल. मराठी भाषेवर प्रेम करावे लागेल,मराठी भाषेची आस्था आणि अस्मिता जपावी लागेल.नियमीत पणे मराठी भाषिकांना मराठीत बोलावे,लिहावे लागेल.मराठी साहित्या तील ज्ञान ग्रहन करावे लागेल.जास्तीत जास्त मराठी साहित्य वाचावे लागेल,मराठी साहित्याचा प्रचार आणि प्रसारमोठ्या प्रमाणात करावा लागेल.

मराठी भाषेला ज्ञानभाषे चा स्त्रोत म्हणून पहावे व अनुभवावे लागेल आणि मराठीभाषा हि ज्ञानभाषा व जागतीक भाषा बनली पाहिजे यासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न करावे लागतील असे प्रतिपादन व आवाहन ही वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन, व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाला बबन पुंड, शाहू वैरागे,बाळासाहेब घोगले,संतोष पुंड,रविंद्र गायकवाड पेण्टर,भारत घोगले,दिपक पुरी, ब्रिजलाल गठठानी, डिगांबर नांदे,नारायण गायकवाड,बालाजी गायकवाड,अजय गायकवाड,विशाल गायकवाड,रावसाहेब जाधव,रमेश गायकवाड, कमलाकर साबळे, देविदास गायकवाड, सोहम गायकवाड,श्रुती पुंड,कृष्णा गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने वाचक,ग्रामस्थ उपस्थित होते.

# अंबाजोगाई येथील फार्मसी महाविद्यालयात आर्थिक साक्षरता शिबीर संपन्न

अंबाजोगाई/प्रतिनिधी

श्रीबालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील विद्यार्थ्यांना गुंतवणूकदार जागृतीचेधडेविद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेसाठी महाविद्यालयाने राबवला. उपक्रमामध्ये विद्यार्थी सुशिक्षित होतात मात्र प्रत्येक विद्यार्थी आर्थिक साक्षर असेलच असे नाही आर्थिक साक्षरता होणे काळाची गरज आहे. आपला पैसा कुठे व कसा गुंतवायचा,पैसे कसे कमवायचे,आलेल्या पैशाचे नियोजन कसे करायचे याचे ज्ञान विद्यार्थी दशेत मिळाले तर भविष्यामध्ये तो विद्यार्थी कधीच आर्थिक अडचणीत येणार नाही, यासाठी संस्थेचे सचिव श्री.राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक श्री संकेत मोदी यांच्या नेतृत्वाखाली श्रीबालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित फार्मसी महा विद्यालयात भारतसरकार च्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन एस इ)अंतर्गत श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित फार्मसी महाविद्यालय अंबाजोगाई येथे फार्मसीमहाविद्यालया च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवशीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला.अलीकडे तरुण वर्गामध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक



नियोजनाचा अभाव जाणून येतो.तरुणांचा कल दिवसेंदिवस चैनी वस्तू,मौजमजा,बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे होत चालला आहे तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे अमिष दाखवून विद्यार्थ्यांची व सर्व सामान्यांची फसवणूक करतात आपणास पाहायला भेटत आहेत यामुळे भविष्यातयेणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते म्हणून विद्यार्थी दशेमध्ये योग्य ती आर्थिक नियोजन त्यांनी केले तर भविष्यातील येणाऱ्या आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या ते श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात, यासाठीच सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज एन एस इ चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला आर्थिक नियोजनाचे सात टप्पे समजावून सांगितले तसेच कॅपिटल मार्केट काय असते? म्युच्युअल फंड व त्याचे वेगवेगळे फायदे,एक्सचेंज ट्रेडेड फंड ईटीएफ,गव्हर्नमेंट बॉण्ड इत्यादी बाबत सखोल असे मार्गदर्शन केले या कार्यक्रमास भरपूर संख्येने महा विद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.विद्यार्थ्यांना सेबीची वेबसाईट व सेबीच्या सारथी पचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना खबरदारीच्या सूचना दिल्या हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस आर तरके यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला तसेच या कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज शहरामध्ये आता तिसऱ्या डोळ्याची नजर,गुन्हेगारीला चाप बसणार शहरात असणार सिसिटिव्ही कॅमेरे

**केज/प्रतिनिधी**

**केज शहरातील मुख्य भागात आता तिसऱ्या डोळयाची नजर असणार आहे.त्यामुळे गुन्हेगारीला चाप बसणार असुन नागरिकांनी याचे स्वागत केले आहे.या तिसऱ्या डोळयाची नजर आताश्रीछत्रपती शिवाजी महाराज चौक,कानडी रोड,हनुमान मंदिर वकील वाडी,बसस्टँड,मंगळवार पेठ चौक,जयभवानी चौक,डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक,मौलाना आझाद चौक,रोजा मोहल्ला,हजरत ख्वाजा बाबा दर्गा,रोजा मोहल्ला,**

अजीजपुरा(ख्वाजाची पांढर),आदर्श शाळा,लोंढे गल्ली,अनिल भोजनालय बीड रोड,कृषी उत्पन्न बाजार समिती कमान,सोनार गल्ली,फुलेनगर चौक,बीड रोड,धारूर रोड,कळंबरोड,उपजिल्हा रुग्णालय,अंबेजोगाई रोडभवानीमाता मंदिर परिसर धारूर रोड,उमरी रोड बाजारपेठ अशा ठिकाणी तिसऱ्या डोळ्याची नजर रहाणार असुन यामुळे गुन्हेगारीला चाप बसणार आहे.या निर्णयाचे केज येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



# तूर्तास धनंजय मुंडे यांचा राजीनामा नाही?

## दमानियांचे पुरावे, मुख्यमंत्र्यांची भेट ;आता अजितदादा नेमकं काय म्हणाले?

**ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती, त्यांनी मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली, त्यानंतर आज अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे, या भेटीकडे राज्याचं लक्ष लागलं होतं. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत या भेटीत काय निर्णय होणार याबाबत मोठी उत्सुकता होती, त्यावर आता अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**

नेमकं काय म्हणाले अजित पवार?

दमानिया यांनी काही कागदपत्रं माझ्याकडे दिली आहेत. मी ती घेतली पाहिली. मी आज रात्री मुख्यमंत्र्यांची भेट घेणार होतो. पण त्यांना नागपूरला जायचं असल्यानं मी त्यांना आत्ताच भेटलो. त्यांनी मला सांगितलं तुम्हाला जशा दमानिया भेटल्या तशा त्या मलाही भेटल्या. मलाही त्यांनी काही कागदपत्रं दिले आहेत. या प्रकरणात तीन प्रकारच्या चौकशा सुरू आहेत. एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन. ही कागदपत्रे मी सीआयडी आणि एसआयटीकडे दिली आहेत. कुणी



पुरावे दिले तर त्याची शहानिशा करावी लागते, म्हणून ते सीआयडी आणि एसआयटीकडे देण्यात आले आहेत. जी वस्तुस्थिती समोर येईल त्यानुसार पुढच्या गोष्टी काय करायच्या ते ठरवलं जाईल, असं मुख्यमंत्री यांनी सांगितल्याचं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

दरम्यान ते पुढे बोलताना म्हणाले की, मी आणि मुख्यमंत्र्यांनी आधीपासूनच सांगितलं. जी घटना सरपंचांच्याबाबत बीड जिल्ह्यात घडली. त्याची चौकशी सुरू आहे. दोषी असतील त्यांना फाशी दिली पाहिजे, तसा प्रयत्न सुरू आहे. चौकशी चालू आहे. कुणाची आणखी नावे आली तर त्यावरही कारवाई केली जाईल. पण कुणाचा संबंधच नसेल तर कारवाईचा प्रश्नच येत नाही. संबंध असेल तर कुणालाही पाठी घालणार नाही. ही माझी, मुख्यमंत्री आणि एकनाथ शिंदे यांची भूमिका आहे. माझ्यावर आरोप झाले, तेव्हा मी राजीनामा दिला होता. माझी गोष्ट वेगळी होती. माझ्या वेळी जी घटना घडली होती मला ते असह्य झालं, म्हणून मी राजीनामा दिला. आता चौकशी सुरू आहे. दोषींना पाठिशी घालणार नाही, कारवाई केली जाईल, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

# एस पी च्या घरासमोर मुख्याधिकारी कार्यकारी अभियंता उपविभागीय अभियंता

## यांच्या फोटोचे पूलाला संरक्षण कठडे बसवण्यासाठी केले दगडाचे पूजन:- मिलिंद सरपते

बीड ।प्रतिनिधी

बीड पोलिस अधिक्षक निवासस्थान समोरील पुलाचे मुख्याधिकारी,कार्यकारी अभियंता,उपविभागीय अभियंता यांचे फोटोचे पूजन करत अभिनव आंदोलन करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. वंचितचे नेते मिलिंद सरपते यांचा वतीने हे अभिनव आंदोलन करण्यात आले.

बीड पोलीस अधीक्षक निवासस्थान समोर येथे पुलाला संरक्षण कठडे नसून याबाबत मुख्याधिकारी नगरपालिका यांना निवेदन दिले होते. की तात्काळ पुलाला संरक्षण कठडे बसवावेत व पडलेला खड्डे देखील बुजवावेत. या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. संबंधित पूल हा राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीड अंतर्गत येत असून या ठिकाणी मोटरसायकल स्वार कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. अनेकजण या ठिकाणी पडत आहेत. संबंधितांना अधिकाऱ्यांना आम्ही सांगूनही कोणीही लक्ष देत नाही. संबंधित मुख्याधिकारी, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीड दुर्लक्ष करत आहेत तरी तात्काळ बंदोबस्त करावा याबाबत नगर




पालिका कार्यालयसह जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग,राष्ट्रीय महामार्ग उपविभाग यांना निवेदनाद्वारे कळविले. परंतू कोणीही त्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे नाविलाजास्तव आम्हांस अभिनव आंदोलन करावे लागत आहे. सबब या ठिकाणी तात्काळ दुरुस्ती करून संरक्षण कठडे बसविण्यात यावे व पडलेले खड्डे बुजवावेत.जर त्याबाबत कोणतीही कारवाई झाली नाहीतर आम्हास नाविलाजास्तव २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता पोलीस अधीक्षक निवासस्थान समोरील पुलाचे पूजन मुख्याधिकारी,कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, उपविभागीय अधिकारी राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्या फोटोचे पूजन करण्यास आम्ही आज २६ जानेवारी २०२५ रोजी पुलाच्या ठिकाणी वंचित बहुजन आघाडी बीड शहर करण्याचा इशारा दिला होता.तरी ९० दिवसात या ठिकाणी संरक्षण कठडे बसवले नाहीत तर या काळात या ठिकाणी अघटीत घटना किंवा जीवित हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उपविभागीय अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीड याची व कार्यालयाची राहील.व त्यांच्यावर प्रचलित कायद्यान्वये मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करण्यात येईल. आंदोलनाची दखल न घेतल्यास या पेक्षाही अति तीव्र प्रकारचे आंदोलन व आत्मदहन पुढील काळात करण्यात येईल. आंदोलनाची एक प्रत कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग लातूर यांना पाठवण्यात आली.तरी

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील.याची नोंद घ्यावी. यावेळी मिलिंद सरपते ,पुष्पाताई तूरूकमारे,लखन जोगदंड,प्रेम कांबळे,ऋषिकेश वाघमारे आदि उपस्थित होते. ९० दिवसात पूलाला संरक्षण कठडे बसवले नाहीत तर पुढील आंदोलन अदितीव्र व आत्मदहन करण्याचा इशारा मिलिंद सरपते यांनी दिला आहे.



# गोवर्धन पवार यांना उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार

बीड ।प्रतिनिधी

दिनांक (२७) शहरातील यशवंत विद्यालय या शाळेचे सामाजिक शास्त्र व क्रीडा विभागाचे शिक्षक गोवर्धन नवनाथराव पवार यांना भूगोल प्रज्ञाशोध केंद्र नवी मुंबई या संस्थेमार्फत दरवर्षी दिला जाणारा उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. गोवर्धन पवार हे आपल्या सामाजिक शास्त्र या विषयांमध्ये नेहमी सक्रिय असतात. तसेच ते भूगोल या विषयासाठी नवनवीन उपक्रम आयोजित करतात. स्पर्धा परीक्षा बद्दल विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन रुजवावा व स्पर्धा परीक्षेची भीती विद्यार्थ्यांमध्ये राहू नये यासाठी प्रयत्न करतात. राज्यामध्ये जे शिक्षक भूगोल विषया विषयी जनजागृती करून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करतात त्या शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो. या निमित्ताने या संस्थेमार्फत २०२४ चा पुरस्कार गोवर्धन नवनाथराव पवार यांना जाहीर करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी रोटरी क्लब बीड मिडटाऊन चे अध्यक्ष नितीनजी गोपन, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश वाघ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक धुमाळ एम.एस.,कार्यकारी अभियंता सुधाकर बाहेरगव्हाणकर या मान्यवरांच्या हस्ते गोवर्धन नवनाथराव पवार यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# गेवराई येथे बंजारा ब्रिगेडची कार्यकारणी बैठक रविकांत राठोड यांच्या उपस्थितीत संपन्न

## तालुकाध्यक्ष अमोल राठोड तर उपाध्यक्ष पोपट चव्हाण यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : येथील शासकीय विश्रामगृह येथे बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांचे उपस्थिती कार्यकारणी बैठक संपन्न झाली आहे. मागील काही दिवसांपूर्वी बंजारा ब्रिगेडची गेवराई तालुका कार्यकारणी निवड करण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्हा सचिव योगेश पवार यांच्या नेतृत्वाखाली बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रवीकांत




राठोड यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. गेवराई तालुका अध्यक्ष अमोल राठोड तर उपाध्यक्ष पोपट चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सचिव योगेश राठोड, शहर अध्यक्ष ड नितीन पवार या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचे स्वागत केले. गोरगरिबांसाठी तसेच समाजासाठी एकजुटीने काम करत रहा असे बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रवीकांत राठोड यांनी बोलताना सांगितले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष किरण पवार, विभागीय उपाध्यक्ष सतीश पवार, विभागीय संघटक राठोड यांनी मार्गदर्शन केले.

# चिंचेवाडी जिल्हा परिषद शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साह संपन्न झाला यावेळी लहान लहान शाळेतील चिमुकल्यांनी माझ्या पप्पांनी गणपतीत आणला या गाण्यावर नागरिकांची मने जिंकली ग्रामीण भागातील या शाळेतील विद्यार्थ्यांचे कलागुण बघून उपस्थित नागरिक व पालक मंत्रमुग्ध झाले. यावेळी चिंचेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेला मैं



हू ना सेवाभावी संस्था ठाणे यांच्या वतीने शाळेला दोन संगणक संच भेट देण्यात आले हे संगणक संच भेट देण्यासाठी मोलाचे योगदान प्रवीण अशोक माळशिखारे यांनी प्रयत्न केले यावेळी शाळेतील मुख्याध्यापक विठ्ठल गव्हाणे सर सहशिक्षक जालिंदर ढवळे ,मोहन वायभासे ,तर या कार्यक्रम प्रसंगी गणेश सुभाष वायभासे ,(उपसरपंच देऊळगाव घाट व चिंचवाडी )कांताशेठ दुकानदार, दत्तू वायभासे, मारुती वनवे ,आजिनाथ वायभासे, सुभाष वायभासे ,(शालेय शिक्षण समिती अध्यक्ष) सुनील वायभासे,जयदिप वायभासे, सचिन वायभासे,आदी मान्यवर ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते पाच हजार रुपये रोख बक्षीस शाळेला देण्यात आले उपस्थित सर्वांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल गव्हाणे यांनी माणले

# परळीतील विकास कामे संदर्भात खा.बजरंग सोनवणे यांना निवेदन-सय्यद साजेद



परळी/प्रतिनिधी

खासदार बजरंग बप्पा सोनवणे हे काल २८ जानेवारी २०२५ रोजी परळी तालुक्यातील दौऱ्यावर होते या दौऱ्याच्या निमित्ताने शिरसाळा येथे कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांना परळी शहरातील विकास कामे आणि परळी शहरातील रखडलेले कामेबाबत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवा नेते सय्यद साजिद बबलू यांच्या वतीने निवेदन देण्यात आला आहे.सविस्तर माहिती अशी आहे की १) केंद्र शासन मार्फत अल्पसंख्याक समाजांच्या विद्यार्थ्यांसाठी परळीत अल्पसंख्याक वस्तीग्रह २०१२ मध्ये निधी आलेला आहे तरी आज १० वर्ष उलटून गेले तरी ते विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आलेला नाही (परळी शहरातील सर्वे नंबर ७५ मध्ये दोन वस्तीग्रह तयार आहे)२) परळी शहरात डॉ भालचंद्र वाचनालयचा काम मागिल ६ वर्षांपासून सुरू आहे आता पर्यंत नागरिकांसाठी खुले करण्यात आले नाही ३) उर्दू अंगणवाडी परळी शहरात एक ही नाही ,आपण स्वतः लक्ष देऊन शहरात उर्दू अंगणवाडीची मान्यता देण्यात यावी ४) महाराष्ट्रात अनेक शहरात उर्दू भाषा प्रेमींसाठी उर्दू घरची स्थापना करण्यात आलेली आहे तरी आपण परळी शहरातील उर्दू घराची मान्यता आणावी ५) परळी शहरातील मध्यवर्ती कब्रस्तान (शहर पोलिस ठाणे च्या बाजूला) या कब्रस्तानाची जुनी ऊेर्ौंपिव थरश्रश्र रोड लेवल आली आहे तर या कब्रस्तानाची लेर्ौंपिव ूरश्रश्र चे काम करण्यात यावी तरी वरील रखडलेले विकास कामे आणि नवीन विकास कामे मागण्या यावर आपण स्वतः लक्ष घालून लवकरात लवकर करून घ्यावी अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवा नेते सय्यद साजिद बबलू यांनी केली आहे

# बीड करांनी पाहिले अवकाशातील प्लॅनेटरी परेडचे विलोभनीय अविष्कार

बीड (प्रतिनिधी)

स्वा.सावरकर महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे आयोजित अवकाशीय दर्शन उपक्रमांमध्ये दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी ४००० लक्ष वर्षांनी होणारे सूर्यमालेतील एकूण आठ ग्रहांचे एका सरळ रेषेतील रेखांकन दुर्बिणी द्वारे पाहण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. भूगोल विभाग आणि बीड येथील खगोल अभ्यासक श्री विकास मिटकर यांनी स्वतःकडे असलेल्या खगोलीय दुर्बिणीच्या द्वारे हे अवकाशातील दुर्मिळ अविष्कार पाहण्याचे आयोजन केले होते. यासाठी बीड मधील शाळा महाविद्यालय व खगोल प्रेमी यांनी बहुसंख्येने उपस्थिती दर्शवून अवकाशातील शनि ,गुरु, त्याचे उपग्रह मंगळ या ग्रहांचे खगोलीय दुर्बिणी द्वारे निरीक्षण केल. शाळेतील लहान मुले शिक्षक, प्राध्यापक , नागरिक आणि



बीड येथील प्रसिद्ध डॉ. डॉ. पी के कुलकर्णी डॉ. पैठणकर, डॉ. गायकवाड व बीड येथील नायब तहसीलदार यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या सोबतच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर , उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे तसेच भूगोल विभागातील प्रा.डॉ.अशोक डोके,प्रा.डॉ. जोगेंद्र गायकवाड महाविद्यालयातील उपस्थितीमध्ये प्रा. राम गव्हाणे , प्रा.डॉ. देविदास नागरगोजे, प्रा.राऊत मॅडम,प्रा.डॉ.कृष्णा बारटक्के, प्रा.डॉ.सुहास जोशी, प्रा.राजपाल जाधव, प्रा.संजय काळे, प्रा अनंत देशपांडे, प्रा.डॉ.तात्याराम सोंडगे,प्रा.डॉ.गोपाळ धोंड,प्रा. पसारकर, प्रा.हरी साबळे इत्यादी प्रमुख उपस्थित होते.

# चैतन्य धर्मनाथ बीज महोत्सव व प्राणप्रतिष्ठा कलशारोहन कार्यक्रमाचे आयोजन ह्न राजेभाऊ कुमावत

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी ग्रामदैवत चैतन्य धर्मनाथ मंदिर बीज महोत्सव व प्राणप्रतिष्ठा कलशारोहन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यानिमित्त दि.३०/०१/२०२५ रोजी चैतन्य धर्मनाथ यांची मुर्तीची प्राणप्रतिष्ठा निमित्त होम हवन इ. होणार आहे. व दि. ३१/०१/२०२५ रोजी चैतन्य धर्मनाथाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशरोहनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानिमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन दुपारी २ ते ५ या वेळेत केले आहे. तरी भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे अवाहन राजेभाऊ कुमावत व



अच्युतराव लाटे, रामेश्वर जमदाडे, भगवान शेजुळ, लहुराव जोगडे, दत्ता येवले, अशोक शेडुते, सुदामराव आगे, वैभव घोडके, गणेश राठोड, गणेश घाटुळ, ओमप्रकाश राठोड, बजरंग कुमावत, नरेंद्र डुकरे, रामभाऊ दराडे यांनी केले आहे.

# करुणा शर्मांच्या गाडीमध्ये पिस्तुल कोणी ठेवलं?

## त्या पोलीस अधिकाऱ्याबाबत धसांचा अखेर मोठा गौप्यस्फोट


भाजपचे आमदार सुरेश धस यांनी आज पत्रकार परिषद घेतली, या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी पुन्हा एकदा वाल्मिक कराड प्रकरणावर बोलताना गंभीर आरोप केले आहेत. तसेच बीड जिल्ह्यातील काही पोलीस अधिकाऱ्यांवर देखील निशाणा साधला आहे. करुणा शर्मा यांच्या गाडीमध्ये पिस्तूल ठेवण्यात आल्याची घटना घडली होती, याबाबत देखील सुरेश धस यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे.


नेमकं काय म्हणाले सुरेश धस?

मुख्यमंत्री येत्या ५ तारखेला आष्टीला येणार आहेत. त्याचं कन्फर्मेशन साहेबांनी दिलं आहे. बाकीच्या काही गोष्टींबाबत मी साहेबांशी चर्चा केली आहे. त्याचे पत्रही दिलं आहे. त्यातील पहिलं पत्र आहे, परळी तालुक्यातील बर्दापूर, परळी ग्रामीण, परळी संभाजीनगर आणि शिरसाळा पोलीस स्टेशन या पोलीस ठाण्यात १० ते १७ वर्षापासून एकाच ठिकाणी असणाऱ्या पोलिसांच्या बीड जिल्ह्याबाहेर बदल्या करा, दुसरं वाल्मिक कराडला फरार होण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मदत केली, ते सर्व लोक, त्यांचे नंबर्स पोलिसांना दिले आहेत. त्यांना सह आरोपी करण्यात यावे अशी मागणी मी केली आहे, असं धस यांनी म्हटलं आहे.

दरम्यान ते पुढे बोलताना म्हणाले की, करुणा शर्मा यांच्या गाडीत पिस्तुल ठेवलं गेलं. या कट कारस्थाना मागे पोलीस अधिकारी आहेत. साडीतील माणूस कोण आहे? त्याच तोंड स्कार्फने बांधलेलं होतं. स्कार्फवाले लोक पोलीस आहेत. ते अजूनही बीड पोलीस दलात आहेत. त्यांना निलंबित करावं. त्यांची चौकशी करावी आणि दोषी आढळल्यास कामावरून काढून टाकावं किंवा यांनी बाहेर जाऊन नवीन टोळ्या तरी तयार कराव्या, असा हल्लाबोल सुरेश धस यांनी केला आहे.

दरम्यान परळी थर्मल पावर स्टेशनला काही अधिकारी गेल्या २० वर्षांपासून एकाच पोस्टवर आहेत. दर तीन वर्षांनी बदली होत असते. सलग चार वर्ष राहू शकत नाहीत. पाचव्या वर्षी राहायचं असेल तर मुख्यमंत्र्यांची परवानगी लागते. त्यामुळे परळी थर्मलला वीस-वीस वर्ष





राहण्यासाठी कोण- कोणत्या मुख्यमंत्र्यांनी परवानगी दिली, याची चौकशी झाली पाहिजे असं पत्र देखील मुख्यमंत्र्यांना दिल्याचं धस यांनी म्हटलं आहे.